वाचा-१)आंजिब/ऑनलाईन बदल्या टप्पा क्र.४ प्राप्त यादी दिनांक११/८/२०२०

२)कक्ष अधिकारी ग्रा.वि.वि. मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र संकिर्ण २०२०/प्रक्र२८२/अस्था-४/दिनांक १८/३/२०२१

३)या का.पत्र क्र जिपबी/मावि-३/कावि ८६७/२०२१ दिनांक ५/४/२०२१

४)या का.पत्र क्र जिपबी/मावि-३/कावि ५३०/१०३६/२०२१ दिनांक २८ एप्रील २०२१

| | |
|---|---|
| | जिल्हा परिषद,बीड<br>शिक्षण विभाग |
| फो i-02442-222297,फॅक्स-02242-222205, | ई-मेल आयडी-ceo_zpbeed@rediffmail.com. |
| जाक्र.क्र.शिवि-मावि-3/कावि /1484 /2021 | दि. 11 / 6 /2021 |

## परिपत्रक

शासनाच्या धोरणानुसार शिक्षक संवर्गाच्या आंतरजिल्हा बदल्या सन २०१७ पासून ऑनलाईन पोर्टलव्दारे होतात. सन २०१७ टप्पा क्र.०१ ते सन २०२० टप्पा क्र ४ असे चार टप्यात आंतरजिल्हा बदल्या झाल्या आहेत. संदर्भ् क्रमांक २ च्या शासन पत्रानुसार टप्पा क्र.१ ते ४ क्रमांक मध्ये ऑनलाईन आंतरजिल्हा बदलीने बीड जिल्हा परिषदेमध्ये बदली झालेल्या शिक्षकांना बीड जिल्हा परिषदेमध्ये सामावून घेवून पदस्थापना दयावयाची आहे.

दिनांक ७/६/२०२१ रोजी सर्व शिक्षकांचे आंजिच्या अनुषंगाने सेवा विषयक मुळ प्रमाणपत्र व आदेश सादर करणे बावत सूचित केले होते परंतू काही शिक्षकांनी मूळ आदेश व मूळ प्रमाणपत्र सादर केलेले नाहीत तरी सर्व ४३ शिक्षकांनी आंजिबच्या अनुषंगाने यापूर्वी पुरविण्यात आलेल्या प्रपत्रातील सर्व मूळ प्रमाणपत्र व मूळ आदेशाच्या प्रती सादर करावयाच्या आहेत करिता खालील मुदा क्र १ ते ८ वरील सूचनाचे काटेकोर पालन करुन दिनांक १४/६/२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता समायोजनासाठी सर्व ४३ शिक्षकांनी बीड बस स्टँड समोर स्काऊट भवन बीड येथे उपस्थित रहावे.

१) समुपदेशानासाठी शिक्षकाची सेवाजेष्टता यादी शासन निर्णय दिनांक २४/४/२०१७ नुसार व दिनांक ७/४/२०२१ मधील मार्गदर्शक सुचना नुसार तयार करण्यात आली आहे.

२)समुपदेशन प्रक्रिये वेळी यादीतील शिक्षक स्वतः उपस्थित राहतील त्यांचे सोबत इतर कोणालाही उपस्थित राहता येणार नाही.

३)समुपदेशनाने उपस्थित राहताना संबंधितांनी पूर्वीच्या जिल्हा परिषदे कडील ओळखपत्र जवळ बाळगणे बंधनकारक असेल.

४)सर्व उपस्थित शिक्षक/शिक्षिका यांनी समुपदेशन प्रक्रीयेच्या ठिकाणी करोरोना प्रतिबंधकउपाय जसे सुरक्षित सामाजिक अंतर ठेवणे,सॅनिटायझरचा वापर करणे व मास्कचा वापर करणे आवश्यक राहील. तसे कोरोना प्रतिबंधक इतर दिशा निदेशांचे पालन करणे अनिवार्य असेल.

निदर्शनास

५) संबंधित शिक्षकांनी स्वतःच्या संदर्भातील दाखल केलेलीव सुरु असलेली न्यायालयीन प्रकरणे ~~निर्दानास~~ न आणणे,विभागीय चौकशी सुरु किंवा प्रस्तावीत असल्यास निदर्शनास न आणणे किंवा रुजू दिनांक याबाबत खोटी माहिती सादर करणे हया बाबी शिस्तभंग सजण्यात येऊन शासन नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची गंभीर नोंद घ्यावी.

६) समुपदेशन प्रक्रियेवेळी संबंधित शिक्षक अनुपस्थित राहिलेस सबधितास जेष्ठता क्रमानुसार व प्रशासकीय सोय पाहून पदस्थापना तात्काळ प्रभावाने जिल्हा परिषद प्रशासनाकडून देण्यात येईल.

७)समुपदेशन प्रक्रिया ही संपूर्णपणे पारदर्शक पध्दतीने पार पाडण्यात येणार असून संपूर्ण प्रक्रीयेचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात येणार आहे. शिक्षकांना समुपदेशन प्रक्रियेवेळी काही आक्षेप असल्यास ते त्या त्या वेळीच नोंदविले जाणे आवश्यक असेल मागाहून नोंदविलेले कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही याची सर्व संबंधितानी नोंद घ्यावी.

८)दिनांक १४/६/२०२१ रोजी सर्व संबंधित यांनी सकाळी १०.०० वाजता सर्व मुळ प्रमाणपत्रासह " स्काऊट भवन " (बस स्टँड समोर)बीड येथे उपस्थिती नोंदवावी.

sd/-

शिक्षणाधिकारी(प्रा.)
जिल्हा परिषद बीड

प्रतिलीपी-१)स्वीय सहाय्यक मा. अध्यक्षा, जिल्हा परिषद, बीड यांना देवून कळविण्यात येते की वरील समूपदेशना बाबत मा. अध्यक्ष महोदयांना अवगत करावे.

२)स्वीय सहाय्यक मा. उपाध्यक्ष तथा मा. सभापती, शिक्षण समिती, जिल्हा परिषद बीड यांना देवून कळविण्यात येते की वरील समूपदेशना बाबत मा. उपाध्यक्ष तथा सभापती महोदयांना अवगत करावे.

३) नोटीस बोर्ड व जिल्हा परिषद बीड संकेत स्थळावर प्रसिध्द करणे करीता देण्यात येते.

शिक्षणाधिकारी(प्रा.)
जिल्हा परिषद बीड